**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर.**

**नगरसचिव विभाग**

**प्रस्ताव क्र २३** **दिनांक : ३०/०७/२०२६**

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रारूप विकास योजना प्रसिध्द करणेबाबत.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३(१) व कलम ३८ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिकेने शहराची मुळ हद्द (तिसरी) व वाढीव हद्द (प्रथम) सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र दि.१४–२०, मार्च २०२४ अन्वये प्रसिद्ध करणेत आलेला आहे.

उपसंचालक नगर रचना, तथा नगर रचना अधिकारी, विकास योजना विशेष घटक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर या कार्यालयाने विद्यमान जमिन वापर नकाशा दि.१४/०८/२०२५ अन्वये, अहवालासह महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे.

उपसंचालक, नगर रचना तथा नगर रचना अधिकारी, विकास योजना विशेष घटक, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांनी दि.१८/०५/२०२६ चे पत्रान्वये अहिल्यानगर शहराचे तयार केलेले प्रारूप विकास योजना नकाशे व अहवाल बंद लिफाफ्यामध्ये, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रसिध्दीसाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेले होते. तथापि तद्नंतर विधानपरिषद आचार संहिता लागू झाल्याने मा. आयुक्त यांनी दि. १८/०५/२०२६ च्या पत्रान्वये कळविलेनुसार उपसंचालक तथा नगर रचना अधिकारी यांनी दि. ३०/०७/२०२६ च्या पत्रानुसार प्रारूप विकास योजना नकाशे व अहवाल बंद लिफाफ्यामध्ये मा. महासभेत सादर केले आहेत. सर्व सदस्यांना प्रारूप विकास योजनेची ठळक वैशिष्ट्ये व संक्षिप्त माहिती असणारे चार पानी माहितीपत्रक देण्यात आले व सर्वांसमोर प्रारूप विकास आराखड्याचे सादरीकरण केले आहे. त्यानंतर महासभेत उपस्थित असलेल्या सर्वांना प्रारूप विकास आराखडा (प्रस्तावित जमीन वापर नकाशा) पाहता यावा यासाठी व तो सर्वांना दिसेल अशा मोठ्या स्क्रीनवर प्रस्तावित जमिन वापर नकाशाचा प्रत्येक भाग सर्व सदस्यांना दोन दिवस दि.३०/०७/२०२६ व दि.३१/०७/२०२६ रोजी दाखवून त्यावर सविस्तर व सखोल चर्चा होऊन सदस्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे निरसन करण्यात आले व प्रस्तावित जमिन वापर नकाशांवर महासभेत विचार विनिमय करण्यात आला व सदस्यांनी सुचविलेले बदल विचारात घेणेत आले.

**चर्चा:-**

**मा. श्री. निखिल वारे :-** शहर विकासाबाबतचा तयार करण्यात आलेला आराखडा या पुढील ५० वर्षाचा काळ विचारात घेऊन तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये भविष्य काळातील मेट्रो लाईन टाकणे कामी नियोजन केलेले दिसुन येत नाही. त्याकरिता आरक्षण दाखवलेले नाही. डेवलपमेंट प्लॅन तयार करताना सर्व प्रकारच्या नागरी सुविधा त्यामध्ये असणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त :-** आपल्या सुचनांचा सदर आराखड्यामध्ये समावेश करणे बाबत सुचना विचारात घेऊ.

**मा. श्री. अविनाश घुले :-** डेवलपमेंट प्लॅन मधील सुचना या कार्यालयाने सुचविल्या पाहिजेत.

**मा. श्री. प्रकाश भागानगरे :-** अहिल्यानगर शहराचा भावी विकासाचा प्लॅन तयार करताना सर्व सन्माननीय सदस्यांना विचारात घेऊन प्लॅन तयार केला पाहिजे. प्लॅनच्या अभ्यासाकरिता काही कालावधी देणे आवश्यक आहे.

**मा. श्री. निखिल वारे :-** डेवलपमेंट प्लॅन अभ्यासाकरिता १ महिन्याचा कालावधी देण्यात यावा.

**मा. महापौर :-** सर्व सन्माननीय सदस्यांच्या सुचना विचारात घेता सर्व प्रथम प्रशासनाने तयार केलेला विकास आराखडा व त्यावरील प्रशासनाची काय भुमिका आहे कशा प्रकारे आराखडा तयार केलेला आहे हे प्रशासनाकडु समाजावुन घेऊ.

...२

मा. श्री. सुभाष लोंढे :- विकास आराखड्याच्या अभ्यासासाठी वेळ देण्यात यावा.

मा. श्री. अविनाश घुले :- कोणत्याही कागदपत्रांच्या अभ्यासाशिवाय विकास आराखड्यावरील निर्णय अंतिम घ्यायला नको.

मा. श्री. प्रकाश भागानगरे, मा. श्री. संपत बारस्कर :- अहिल्यानगर शहराचा भावी विकासाचा प्लॅन तयार करावयाचा आहे. पुढील ३०,४० वर्षाचे नियोजनानुसार प्लॅन करणे आवश्यक असल्याने सर्व सदस्यांना अभ्यासासाठी वेळ देऊन त्यांच्या सुचना हरकती घेऊन प्लॅन तयार करण्यात यावा.

मा. उपमहापौर :- प्रशासनाने तयार केलेला विकास आराखडा प्रथम पाहुन घेऊ त्यानंतर त्यावर आपण निर्णय घेऊ.

मा. आयुक्त :- आजच्या विकास आराखड्यामध्ये नव्याने २७ आरक्षणांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मा. श्री. मनोज कोतकर :- यापुर्वी केलेल्या आरक्षित जागेवरील फक्त बिल्डर लोकांचेच आरक्षण उठवण्यात आलेले आहे. शेतक-यांच्या शेत जमिनीवर टाकण्यात आलेले आरक्षण उठवण्यात आलेले नाही. व शेतक-यांना अद्यापर्यंत त्याचा मोबदला मिळालेला नाही.

मा. श्री. निखिल वारे :- आजच्या तयार केलेल्या विकास आराखड्यामध्ये २०४५ पर्यंत करावयाच्या विकासाबाबतचा प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. या पुढे शासनाकडुन २ वर्षात नगर शहराच्या हद्द वाढीमध्ये काही फेरबदल झाले तर काय करणार ?

मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :- अहिल्यानगर शहराचा यापुढील २५ वर्षाकरिता वाढीव लोकसंख्या विचारात घेऊन त्या लोकसंख्येकरिता त्या त्या भागामध्ये आवश्यक असणा-या नागरी सुविधा पुरविणे कामी नगरपालिकेस आवश्यक असणा-या जमिनीवर विविध कारणांरिता आरक्षण टाकण्यात आलेले आहे. पुढील काळात शहराची हद्दवाढ झाल्यास हद्दवाढ झालेल्या भागाचा नव्याने सुधारित विकास आराखडा तयार करावा लागेल.

मा. श्री. अविनाश घुले :- प्रशासनाने सुचविलेल्या विकास आराखड्यामध्ये नगरसेवकांना बदल करण्याबाबतचे अधिकार आहेत काय?

मा.श्री. गणेश भोसले :- सुचना बदल करण्याचा सभेस अधिकार आहे. नगरसेवकांच्या सुचना हरकती विचारात घ्याव्या लागतील.

मा. आयुक्त :- नगर शहराच्या विकासासाठी तयार करण्यात आलेला विकास आराखडा यामध्ये नागरीकांच्या जमिनीवर आरक्षण पडणार असल्याने सदरचे आजचे सभेचे कामकाज हे गोपनीय स्वरुपाचे असल्याने त्याची माहिती नागरिकांपर्यंत जाणार नाही. याची खबरदारी घेण्यात यावी.

मा. श्री. कुमार वाकळे :- विकास आराखड्याबाबत माहिती देण्यात यावी.

मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :- महानगरपालिका क्षेत्रामध्ये शाळा, हॉस्पीटल, शॉपिंग कॉम्प्लेस यांचे रिजर्वेशन टाकण्यात आलेले आहे. तथापी यांचे प्रमाण सद्यस्थिती प्रमाणे अधिक आहे. शाळेच्या दाखवलेल्या आरक्षण ठिकाणी शाळेची आवश्यकता नसेल तर तेथे वापरामध्ये बदल करुन आपण दुस-या उपयोगाकरिता सुचना करु शकता.

१. बोल्हेगाव भागात हेल्थ फॅसिलीटी अंतर्गत रजिर्वेशन टाकलेले आहेत. १ एकर क्षेत्र आहे त्याचा सर्वे नंबर १२७ आहे.

२. सर्वे नंबर १२६ शॉपिंग कॉम्प्लेस व पार्किंग आरक्षण टाकलेले आहे. २.२१ हेक्टर जागा असुन टी.पी. स्किम ची जागा आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात जागा आहे. शोसल इंफ्रास्ट्रक्चरची जागा आहे. ले-आऊट मधल १५% जागा आलेले आहे. त्यामध्ये आरक्षण टाकलेले आहे.

३. आरक्षण क्रमांक १५७,१५८ सर्वे नंबर ३३,३४,३५,३६ एज्युकेशन फॅसिलीटी करिता जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

४. आरक्षण क्रमांक १५९ महानगरपालिका कार्यालयाकरिता जागा आरक्षित करण्यात आलेली आहे.

५. आरक्षण क्रमांक १३४ व्हेजिटेबर मार्केट साठी जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. एकुण क्षेत्र १.५ एकर आहे.

जुने २०१२ चे आरक्षण आहे तसेच ठेवलेले आहे. केलेल्या मागणीनुसार वापरामध्ये बदल केलेला आहे. सर्वे नंबर ११ नागापुर सोशल वेलफेअर ऑफिस साठी जागा आरक्षित करण्यात आलेली आहे.

Aade

मा. श्री. कुमार वाकळे - आरक्षण क्रमांक ४६ शॉपिंग कॉम्पलेस जुन आरक्षण आहे. ही जागा मल्टी परपज करा. जागा मनपाच्या ताब्यात तिचे क्षेत्र ३६ गुंठे आहे. प्ले ग्राऊंड साठी बोल्हेगाव गावठाण येथील ५५ गुंठे जागा मुळ मालकाच्या ताब्यात आहे. आरक्षण क्रमांक ९९ खाजगी जागा आहे. संबंधितास टी.डी.आर. देऊन सदरची जागा फायर फायटर करिता ताब्यात घेण्यात यावी.

**मा. श्री. सागर बोरुडे :-** नागापुर भागात सोशन वेलफेअर अंतर्गत समाजकल्याण तर्फे मुला मुलींकरिता सुविधा देणेकामी जागा आरक्षित दाखविलेली आहे. सदर जागेची मालकी खाजगी आहे. त्यावर आरक्षण आहे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक ४१३ महानगरपालिका वापराकरिता दर्शविण्यात आलेली आहे. जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेली आहे. आरक्षण क्रमांक ४३० सर्वे नंबर ४८९ ॲमिनीटी स्पेस आहे. जागा हस्तांतरित झालेली आहे. आरक्षण क्रमांक ४४९,४५० ची जागा हस्तांतरित झालेली आहे. आरक्षण क्रमांक ४४८ सर्वे नंबर ४९७ ची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. आरक्षण क्रमांक ४८३ खाजगी मालकी जमीन आहे. एम.एस.इ.बी. वापरा करिता आरक्षित करण्यात आलेली आहे. सर्वे नंबर ३४७, ३४६ ची जागा डंपिंग ग्राऊंड करिता आरक्षित करण्यात आलेली आहे.

**मा. श्री. मनोज कोतकर :-** केडगाव विभागामध्ये ग्रीन झोन ऐवजी येलो झोन करण्यात यावा.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** पुर्वीच्या विकास आराखड्यामध्ये केडगाव विभागात ४०% ग्रीन झोन होता तो आता २०% करण्यात आलेला आहे. लोकसंख्येच्या वाढीनुसार आरक्षण टाकण्यात आलेले आहे.

**मा. श्री. मनोज कोतकर :-** सुधारित आराखड्यामध्ये मेहेरबाब समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता २४ मीटर ठेवण्यात आलेला आहे. त्याठिकाणी २४ मीटर रस्त्याची आवश्यकता नाही. महानगरपालिकेमार्फत त्याठिकाणी २४ मीटर रस्ता होणार नाही. उपनगराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने केडगाव विभागात बी.एल.ओ. झोन मोठ्या प्रमाणावर टाकण्यात यावा. त्यानुसार आरक्षणे वाढविण्यात यावीत.

**मा. आयुक्त :-** या विकास आराखड्यामधील विकास कामकाज हे सन २०४९ पर्यंत गृहीत धरुन आरक्षण टाकण्यात आलेले आहे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आपणांस आवश्यक असणा-या सुचनांचा महासभेच्या ठरावामध्ये समावेश करुन ठराव करण्यात यावा. त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करु.

आरक्षण क्रमांक ४९० उद्यान विकसित करणे, आरक्षण क्रमांक ४९१ अग्निशमन विभागाकरिता जागा आरक्षित आहे. जागा मालकी खाजगी आहे., आरक्षण क्रमांक ४७३ सर्वे नंबर १५० खाजगी मालकी जागा आहे., आरक्षण क्रमांक ४७२ सर्वे नंबर १५२ इंडस्ट्रिअल झोन करिता जागा आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक ४७० खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित आहे., आरक्षण क्रमांक २२५,२२६ पार्किंग करिता आरक्षित आहे.

<u>नालेगाव :-</u>

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** सर्वे नंबर १४९ आरक्षण क्रमांक २४६ अमरधाम करिता आरक्षित आहे.

**मा. श्री. सुभाष लोंढे :-** सीना नदीच्या बाजुने ग्रीन बेल्ट क्षेत्र किती आहे.

**मा. श्री. गणेश भोसले :-** सीना नदीला काही ठिकाणी कमी जास्त रुंदी का येत आहे. अचानक काही ठिकाणी नदीच पात्र कमी का होत आहे?

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** सीना नदीच्या आजुबाजुच्या शेतक-यांनी नदीच्या बाजुस गाळ पेर काढुन सीना नदीचे पात्र कमी अधिक प्रमाणात झालेले आहे.

**मा. श्री. अविनाश घुले :-** विकास आराखड्यामध्ये औद्योगिक क्षेत्र दाखविलेले पुरेषा प्रमाणात आहे का ? विकास आराखडा प्रसिध्द करण्यास मुदत कधी पर्यंत आहे ? विकास आराखड्यात आरक्षित वापरासाठी ठेवण्यात आलेल्या जागेत आपण आरक्षण बदल करु शकतो का ? महानगरपालिका सभेस अधिकार आहे का ? पुर्ण पणे जागा वापर करता येतो का ?

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** विकास आराखडा प्रसिध्द करण्यास मुळ मुदत १२ सप्टेंबर पर्यंत मुदत आहे. प्रसिध्दी करिता १ महिना बाकी आहे. विकास आराखड्यावर अभ्यास करुन निर्णय घेण्यात यावा. नदीच्या पुर्वी पासुन दाखविण्यात आलेल्या हद्दी बदलता येत नाहीत.

**मा. आयुक्त :-** नदीच्या सीमा बदलता येत नाही. प्लॅन मध्ये काही बदल असतील तर ते सांगा.

**मा. श्री. गणेश भोसले :-** सभा स्थगित करुन विकास आराखडा अभ्यासासाठी वेळ द्या.

**मा. श्री. अविनाश घुले :-** विकास आराखडा अभ्यास केला तर बदल सुचविता येतील. त्याकरिता सभा तहकुब ठेवा.

**मा. श्री. निखिल वारे :-** विकास आराखड्याचा अभ्यास करण्याकरिता वेळ द्यावा. विकास आराखड्यामध्ये एखादा रस्ता २४ मीटर रुंदीचा प्रस्तावित करुन आरक्षित करण्यात आला. तदनंतर सदरचा रस्त्याची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर विकास आराखड्याप्रमाणे आवश्यक असणारी रस्त्याची रुंदी २४ मीटर जागेवर भरत नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची ?

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** विकास आराखड्यानुसार रस्त्याचे आरक्षण टाकण्यात आलेले असल्याने मोजणी नकाशानुसार जागा उपलब्ध करुन घ्यावी लागेल जागा उपलब्ध करुन देण्याची संबंधित जागा मालकांची जबाबदारी आहे. त्याठिकाणी बांधकाम परवानगी देणा-यांची जबाबदारी नाही. मोजणी नकाशा अंतिम धरला जातो.

**मा.श्री.गणेश भोसले:-** चाणक्य चौकात खाऊ गल्ली जवळ महानगरपालिकेची ५ गुंठे जागा आहे. ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक ३८८,३८९ शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. आरक्षण क्रमांक ३८२ महानगरपालिका वापराकरिता आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक ३९१ पार्किंगकरिता आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक ६८ खेळाचे मैदानाकरिता आरक्षित आहे. खाजगी जागा आहे.

**मा. श्री. गणेश भोसले :-** नक्षत्र लॉन शेजारी महानगरपालिकेची जागा आहे. त्यावर आरक्षण दाखवा. महानगरपालिकेची मालमत्ता नोंद दाखवा.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक ४०२ वाचनालयासाठी आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक ४१८ खेळाचे मैदानासाठी आरक्षित आहे. आरक्षण जुने आहे वापरात बदल केलेला असुन त्याचे क्षेत्र ४२ गुंठे आहे. आरक्षण क्रमांक ३९८ शॉपिंग सेंटर साठी आरक्षित आहे. दीड एकर जागा आहे.

**मा. श्री. गणेश भोसले :-** आनंदधाम भक्त निवास येथे एक मंदिर आहे. गार्डन आहे. ते या नकाशामध्ये दर्शविण्यात आलेले नाही. गार्डन भक्त निवास यामध्ये अस्तित्वात रस्ता नाही. या नकाशामध्ये तो दाखविण्यात आलेला आहे. नकाशामध्ये रस्ता असेल तर प्रत्यक्षात जागेवर रस्ता ओपन करुन द्यावा.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** सुचनेनुसार दुरुस्ती बाबत ठरावामध्ये उल्लेख करण्यात यावा.

**मा. श्री. सुभाष लोंढे :-** आजची सभा तहकुब करुन दिनांक ३१/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात यावी.

**मा. श्री. निखिल वारे :-** यापुढे या सभागृहामध्ये सभेचे कामकाज सुरु करण्यापुर्वी राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करुन प्रत्येक सभेची सुरुवात करण्यात यावी. अशी मी सुचना करतो.

**सर्व सदस्यांनी :-** **श्री. वारे** यांच्या सुचनेस अनुमोदन देऊन राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करुन सभेस सुरुवात केली.

**मा. श्री. सुभाष लोंढे :-** विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत विभागाने माहिती द्यावी.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक ६२ रेस्ट हाऊस व महानगरपालिका वाहतुक विभाग आफफिस करिता करिता आरक्षण करण्यात आलेले आहे. पुर्वी याठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स आरक्षण टाकण्यात आलेले होते.

**मा. श्री. विकी जगताप :-** ऑफिसकरिता ५ गुंठे जागा पुरणार नाही. जागा वाढवुन घेण्यात यावे.

**मा. श्री. महेश तवले :-** आमच्या भागामध्ये २० वर्षापुर्वी १८ मीटर रस्ता आरक्षण टाकण्यात आले होते. सदर भागातील रहिवासी यांना वापराकरिता शेजारीच ९ मीटर रस्ता अस्तित्वात असुन त्याचा वापर चालु आहे. तरी, पुर्वी आरक्षित करण्यात आलेला १८ मीटर रुंद रस्ता आरक्षण रद्द करण्यात यावे. तपोवन रोड कडे जाणारा १८ मीटर रस्ता विकास आराखड्यामध्ये दाखविला गेलेला नाही.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षित करण्यात आलेला रस्ता जागेचे आरक्षण रद्द किंवा याचे रुंदी कमी करता येणार नाही. त्या परिसरातील नागरी लोकसंख्या विचारात घेऊन रस्ता रुंदीकरणाबाबत विचार करता येईल. आराखडा प्रसिध्दी नंतर प्लॅनिंग कमिटी याबाबत निर्णय घेईल. आरक्षण क्रमांक ६३ शैक्षणिक प्रयोजनाकरिता आरक्षित आहे. त्याठिकाणी प्ले ग्राऊंड बनवता

...५

येईल. आरक्षण क्रमांक ६४ सर्वे नंबर ५७ महानगरपालिका बस स्टॅण्ड हेल्थ सेंटर बनवता येईल. आरक्षण क्रमांक १०७ सर्वे नंबर ८२ सोशल वेलफेअर करिता आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक १०४ शॉपिंग सेंटर, पार्किंग करिता आहे. आरक्षण क्रमांक १०३ आरोग्य सुविधा करिता आरक्षित आहे. पुर्वीचे आरक्षणात वापर बदल दर्शविलेला आहे. आरक्षण क्रमांक १४८ ॲम्युजमेंट पार्क करण्यात आले आहे. पुर्वी शॉपिंग कॉम्प्लेक्स होते.

**मा. श्री. निखिल वारे :-** आरक्षण क्रमांक १४८ मध्ये ॲम्युजमेंट पार्क दर्शविण्यात आलेले आहे. त्याठिकाणी पुर्वीच्या आरक्षणा प्रमाणे शॉपिंग कॉम्प्लेक्स चे आरक्षण ठेवण्यात यावे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** सर्वे नंबर ४० जागा १.८३ हेक्टर, सर्वे नंबर ४२ मधील आरक्षण प्ले ग्राऊंड ठेवण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १४२ प्ले ग्राऊंड आरक्षण केलेले आहे. मुकुंदनगर भागामध्ये नव्याने आरक्षण टाकण्यात आलेले नाही. काही आरक्षणांवरील वापरात बदल करण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १८१ मागील गार्डन आरक्षण कायम केलेले आहे.

**मा. श्री. शेख :-** सदर ठिकाणी आरक्षित असलेले जागेचे मा. न्यायालयाचे आदेशानुसार आरक्षण चेंज झालेले आहे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** मा. न्यायालयाचे आदेश असतील तर त्याप्रमाणे कमिटी निर्णय घेईल. आरक्षण क्रमांक ३३७ सि.क्यु.ए.व्ही. ऑफिस, आरक्षण क्रमांक १७५ एस.टी.पी. साठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १७४ पुर्वी हॉस्पिटल साठी आरक्षित होते आता शॉपिंग सेंटर साठी करण्यात आलेले आहे.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** अहिल्यानगर शहराच्या विकास आराखड्याच्या प्लॅनिंग कमिटी मध्ये मा. श्री. प्रकाश भागानगरे यांना नियुक्त करण्यात यावे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक १३८ शैक्षणिक सोयी सुविधा करिता आरक्षित करण्यात आलेली आहे. आरक्षण क्रमांक १३७ खेळाचे मैदानाकरिता आरक्षित करण्यात आलेले आहे. सदरची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** याभागामध्ये ट्रक टर्मिनल्सचे आरक्षण पुर्वी दाखविण्यात आलेले होते. ते आरक्षण या विकास आराखड्यामध्ये कसे उठविण्यात आले.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** १० वर्षाच्या आत आरक्षित जमिनीवर महानगरपालिकेने नाव लावले नाही. किंवा जागा ताब्यात घेतली नाही तर संबंधित जागा मालक नोटीस देऊन भरपाई द्या किंवा जागा वरील आरक्षण उठविणे बाबत मागणी करतात. महानगरपालिका भरपाई देऊ शकली नाही तर मा. न्यायालयाकडुन आरक्षण उठविणे बाबत कार्यवाही करण्यात येते. सर्वे नंबर २३६ ट्रक टर्मिनंस दर्शविण्यात आलेला आहे. आरक्षण क्रमांक २६९ मेडिकल कॉलेज दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १०० शॉपिंग कॉम्प्लेक्स दर्शविण्यात आलेले आहे.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** बोल्हेगाव हद्दीत आरक्षण क्रमांक २७१ मध्ये प्ले ग्राऊंड १.१७ हेक्टर क्षेत्र दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक ५२ टाऊन हॉल ४५ गुंठे सर्वे नंबर १५ स्मशान भुमी ५६ गुंठे जागा आहे.

मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :- आरक्षण क्रमांक १३९, १४० पार्क साठी आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक २८९ पब्लिक युटिलीटी वापरासाठी आहे. आरक्षण क्रमांक १२६ प्ले ग्राऊंड आरक्षण क्रमांक १२७ सोशन वेलफेअर आरक्षण क्रमांक १२९ महानगरपालिका सभागृह आरक्षण क्रमांक १७२ स्टेडियम साठी आरक्षण क्रमांक १७१ पार्किंग साठी दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १९,२०,२१,२२,२३ हा कमर्शिअल झोन दर्शविण्यात आलेला आहे.

**मा. श्री. निखील वारे :-** वरिल दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये गोर गरिब होतकरु विद्यार्थ्यांसाठी लायब्ररीचे आरक्षण दर्शविण्यात आलेले नाही. लायब्ररी चे आरक्षण टाकण्यात यावे. तसेच मोठा भुखंड असेल तर त्याठिकाणी प्लेग्राऊंड, आय.टी. पार्क दर्शविण्यात यावे. तसेच भविष्यातील दृष्टीकोनातुन मेट्रो स्टेशन करिता जागा आरक्षित करण्यात यावी. महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाकरिता प्रत्येक झोनला १ याप्रमाणे ४ झोन करिता ४ ठिकाणी जागा आरक्षित करण्यात यावी.

**मा. श्री. बाबासाहेब वाकळे :-** सावेडी विभागातील ग्रीन बेल्ट मध्ये सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार निर्मिती होईल या दृष्टीकोनातुन येलो झोन करण्यात यावा.

Awale

**मा. श्री. गणेश भोसले :-** अहिल्यानगर शहर वाडीच्या दृष्टीकोनातुन ग्रीन बेल्ट आवश्यक असल्याने आहे तसाच ठेवण्यात यावा.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** ग्रीन बेल्ट आहे तसाच ठैवण्यात यावा. भिस्तबाग परिसरामध्ये असणा-या महाल ची जागा येथे आरक्षण टाकण्यात यावे. सदर महालाची जागा खाजगी मालकीची आहे. येथे आरक्षण टाका.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** हेरिटेजची जागा असेल तर आरक्षण टाकता येणार नाही. खाजगी जागा असेल तर त्याठिकाणी सुशोभिकरणाच्या दृष्टीकोनातुन उद्यानचे आरक्षण टाकता येईल.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** महालाच्या जागेचे प्रशासनाने कागदपत्र गोळा करुन जागेची खात्री करुन घ्यावी. सदर जागेचे मालक महानगरपालिकेकडुन पैसे मागतात महानगरपालिका संबंधितांना रोख स्वरुपात आर्थिक नुकसान भरपाई देऊ शकत नाही. त्यामुळे त्याठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स व उद्यान विकसित करुन मिळणा-या उत्पन्नामधुन संबंधित जागा मालकांना हिस्सा ठरवुन देण्यात यावा.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** ठरावामध्ये त्याप्रमाणे नमुद करण्यात यावे. आरक्षण क्रमांक ८८ सुपर मार्केट आरक्षण क्रमांक ८६ टाऊन हॉल, आरक्षण क्रमांक ८५ व्हेजिटेबल मार्केट व पार्किंग, आरक्षण क्रमांक ८७ एज्युकेशन फॅसिलिटी, आरक्षण क्रमांक ७८ प्ले ग्राऊंड, आरक्षण क्रमांक ८४ म्युनिसिपल पर्पस, आरक्षण क्रमांक ६४ हेल्थ फॅसिलिटी, आरक्षण क्रमांक ५८ ए.एम.टी. बस स्टॅण्ड व हेल्थ सेंटर, आरक्षण क्रमांक ३९ फायर ब्रिगेड साठी, आरक्षण क्रमांक ३४ एज्युकेशन फॅसिलीटी, आरक्षण क्रमांक ३३ हेल्थ फॅसिलीटी, आरक्षण क्रमांक ४२ लायब्ररी साठी, आरक्षण क्रमांक ४३ म्युनिसीपल पर्पज पुर्वी याठिकाणी पोलीस स्टेशन दर्शविण्यात आलेले होते. त्यात बदल करण्यात आलेला आहे. आरक्षण क्रमांक ७५ म्युनिसीपल पर्पज, आरक्षण क्रमांक ९० शॉपिंग सेंटर.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** सर्वे नंबर २९१ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आरक्षणाबाबतची तसेच एकुण क्षेत्र आरक्षित करण्यात आलेले क्षेत्र प्रत्यक्ष उता-यावर कोणाचे नाव आहे. व इतर माहिती देण्यात यावी.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** सर्वे नंबर २९१/१ चे क्षेत्र ३.३९ हेक्टर, सर्वे नंबर २ चे क्षेत्र २.९८ हेक्टर आहे. सर्वे नंबर २९१ मध्ये स्पोर्ट कॉम्प्लेक्स दर्शविण्यात आलेले आहे. त्याकरिता १३६ गुंठे जागा आहे. आरक्षण क्रमांक २२ विद्युत विभागाच्या सब स्टेशन साठी दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक २८८/२८५ म्युनिसिपल पर्पज साठी आहे.

**मा. श्री. संपत बारस्कर :-** वरिल दर्शविलेल्या आरक्षणामध्ये एका ठिकाणी शाळेचे आरक्षण दर्शविण्यात यावे. याभागात शाळेचे आरक्षण नाही. तसेच जैन धर्मियांचे मंदिर उभारणे कामी आरक्षण दर्शविण्यात यावे.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम :-** आरक्षण क्रमांक २३ शॉपिंग कॉम्प्लेक्स व पार्किंग साठी आरक्षित आहे. आरक्षण क्रमांक २८० म्युनिसिपल पर्पज साठी आहे. आरक्षण क्रमांक १ पब्लिक युटिलीटी साठी सर्वे नंबर २८९ आरक्षण क्रमांक २ /३ म्युनिसिपल पर्पज, सर्वे नंबर २८७,२८८ आरक्षण क्रमांक ४ प्ले ग्राऊंड साठी पुर्वी सोशल वेलफेअर चे आरक्षण होते. सर्वे नंबर २८३,२८४ आरक्षण क्रमांक १८ स्पोर्ट कॉम्प्लेक्स दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक. १५ चिल्ड्रन प्ले ग्राऊंड दर्शविण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक १६ महानगरपालिकेचा ओपन स्पेस आहे. आरक्षण क्रमांक १६ स्पोर्ट कॉम्प्लेक्स १ हेक्टर ५० गुंठे जागा, आरक्षण क्रमांक २५ व्हेजिटेबर मार्केट.

**मा. श्री. सुभाष लोंढे :-** नालेगाव परिसरातील जुने आरक्षण व नवीन टाकण्यात आलेले आरक्षण यामधील फेरबदल सांगा.

**मा. श्रीमती. मुल्ला मॅडम -** आरक्षण क्रमांक २१५,२१८ म्युनिसिपल पर्पज साठी ठेवण्यात आलेला आहे. तसेच आरक्षण क्रमांक २१४,२१५ हेल्थ फॅसिलीटी साठी ठेवण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक ३२५ म्युनिसिपल पर्पज साठी ठेवण्यात आलेले आहे.

**मा. श्री. सुभाष लोंढे :-** हे आरक्षण मा. न्यायालयाच्या आदेशानुसार उठवण्यात आलेले आहे. मा. नगरसेवकांनी सुचनांनुसार ठराव करण्यात यावा.

**मा. महापौर मॅडम :-** अहिल्यानगर शहराचा तयार करण्यात आलेला प्रारुप विकास आराखडा त्यावर आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या सुचना / हरकती विचारात घेऊन नियोजन नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने सर्व सुविधा समावेशक होईल अशा पध्दतीने तयार करणे कामी नियोजन समिती स्थापन करण्यात येत असुन समितीमध्ये नगरसेवक मा. **श्री. बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,** नगरसेवीका **मा. श्रीमती गौरी अजिंक्य बोरकर,** नगरसेवीका, **मा. श्रीमती संध्या बाळासाहेब पवार** यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**ठराव -** उपसंचालक नगर रचना तथा नगर रचना अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेल्या अहिल्यानगर शहराचा प्रारुप विकास योजना नकाशा, अहवाल आणि तद्नुषंगिक कागदपत्रांचे आजच्या सभेत अवलोकन करून, त्यात काही बदल आवश्यक आहेत, असे सन्माननिय सदस्यांचे मत झाले. त्यानुसार प्रारुप विकास योजनेत खालील प्रमाणे बदल सुचविण्यात येत आहेत.

१. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वातील सुविधा विचारात घेता शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, वाणिज्य सुविधा यांसाठीचे क्षेत्र अतिरिक्त असलेने तसेच महानगरपालिकेवरील भविष्यात येणारा जागा अधीग्रहनाचा खर्च कमी करणेच्या दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे बदल सुचविणेत येत आहे.

i. शैक्षणिक सुविधेकरिता आरक्षित करणेत आलेल्या आरक्षणांपैकी ज्या आरक्षणांच्या आजुबाजुस विद्यमान शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत अशा आरक्षण क्र. ३४, ६३, ७९ (अंशतः -स.क्र.१५ चे क्षेत्र), ८७, १०१, १४४, १६८, १९५, २९६,३५८, ३८९ व ४८९ ही आरक्षणे वगळण्यात यावी.

ii. मौजे नालेगाव येथील स. क्र. १३ येथील आरक्षण क्र.२९८ शैक्षणिक सुवीधा मधील उत्तरेकडील अर्धे क्षेत्र वगळुन उर्वरीत क्षेत्र खेळाचे मैदान म्हणून आरक्षित करणेत यावे.

iii. आरोग्यविषयक सुविधेकरिता आरक्षित करणेत आलेल्या आरक्षणांपैकी ज्या आरक्षणांच्या आजुबाजुस विद्यमान आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत अश्या आरक्षण क्र. ६४, ७०, ९७, १०३, १८३, २२५, २५२, ४२७ ही आरक्षणे वगळण्यात यावी.

iv. आरक्षण क्र. १२२ व १०२ ही "दुकान केंद्र" याकरीता ठेवण्यात आलेली आरक्षणे पाईपलाईन रोड परिसरात आहेत. सदर परिसराचा विचार करता पाईपलाईन रोड परिसरात फ़ार मोठ्या प्रमाणावर दुकाने विद्यमान आहेत. अशा परिस्थितीत या आरक्षणांची आवश्यकता नाही. तरी ही आरक्षणे वगळणेत यावी.तसेच या परिसरातील भाजी मंडईची आवश्यकता पाहता आरक्षण क्र.१११ चे दोन भागांमधे विभाजन करुन एक भाग "भाजी विक्रीकेंद्र" व दुसरा भाग " दुकान केंद्र व पार्किंग" याप्रमाणे नावे देण्यात यावी.

v. वाणिज्य व तत्सम सुविधेकरिता आरक्षित करणेत आलेल्या आरक्षण क्र ४०, ८५, १०४, ३८८, ३६१, ४३५ (अंशत:)वगळण्यात यावे.

२. भविष्याच्या दृष्टीकोणातुन आरक्षण क्र. २१२ मधील १.२० हे क्षेत्र शैक्षणिक सुविधेकरीता आरक्षित करुन उर्वरित भागामध्ये आरोग्य सुविधेकरिता जागा उपलब्ध करुन देणेत यावी.

३. आरक्षण क्र. ७३ शैक्षणिक सुविधेसाठीचा वापर बदलुन आरोग्य सुविधेकरता करणेत यावे.

४. प्रस्तावीत जमीन वापर नकाशामधील खेळाचे मैदान याकरिता प्रस्तावित असलेल्या क्षेत्राची कमतरता भरून काढणेच्या दृष्टीकोनातून आरक्षण क्र. ११२ ट्रक टर्मिनल्स, आरक्षण क्र. ८३ चे नाव बदलुन "खेळाचे मैदान" करणेत यावे तसेच आरक्षण क्र. ३६ चे नाव बदलून "क्रिडा संकुल" करणेत यावे. व आरक्षण क्र. ३२३ मधील पश्चिमेकडील २ हे. क्षेत्र वगळण्यात यावे. तसेच आरक्षण क्र. १७० खेळाचे मैदान हे शेती विभागामध्ये येत असल्याने त्याची आवश्यकता नसल्याने सदर आरक्षण वगळण्यात यावे.

...८

५. मौजे सावेडी येथील स. क्र. २६१/अ/१येथे खेळाचे मैदान करीता जागा आरक्षित करणेत यावी.

६. आरक्षण क्र.११० खेळाचे मैदान या आरक्षणाच्या दक्षिण बाजुस जवळच आरक्षण क्र.१४१ हे समान हेतुकरिता राखीव ठेवणेत आले असल्याने सदर आरक्षण क्र.११० वगळण्यात यावे. तसेच आ.क्र. ५०५ चे जवळच पुर्वेस आ.क्र.५०९ हे खेळाचे मैदान करिता आरक्षित असलेने आ.क्र.५०५ वगळणेत यावे. तसेच मौजे सावेडी स. क्र. ९९पै येथील आरक्षण क्र.१६५ खेळाचे मैदान वगळण्यात यावे.

७. मौजे सावेडी येथील स.क्र.२९१ पै. येथे टाकण्यात आलेले आ.क्र. १७ क्रीडा संकुल चे संपूर्ण क्षेत्र,मौजे भिस्तबाग स.क्र. ८पै येथील आरक्षण क्र.५६ पार्क व स्विमिंग पूलचे संपूर्ण क्षेत्र, मौजे भिस्तबाग येथील स.क्र.१३पै,१४पै,१५पै येथे टाकण्यात आलेल्या आरक्षण क्र. ७८ खेळाचे मैदान मधील पुर्वेकडील १.९ हे क्षेत्र आणि मौजे माळीवाडा येथील स.क्र. ५१ पै येथे टाकण्यात आलेले आ.क्र.३८६ खेळाचे मैदान संपूर्ण क्षेत्र ही आरक्षणे वगळण्यात यावीत. आरक्षण क्र. १४१ खेळाचे मैदान मधील उत्तरेकडील २६ गुंठे क्षेत्र वगळून आरक्षण कायम ठेवण्यात यावे. आरक्षण क्र. ६५, ६९ व आरक्षण क्र.२९७ खेळाचे मैदान वगळण्यात यावी. मौजे सावेडी येथील स.क्र. ९ या भुखंडावरील आरक्षण क्र.११९ हे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्व्ये रद्दबातल झालेले आहे. सबब हे संपूर्ण आरक्षण वगळण्यात यावे.

८. आरक्षण क्र. १ चे नाव बदलून "सार्वजनिक सुविधा + MSEB ESS" याप्रमाणे करणेत यावे व भिस्तबाग महल च्या आजुबाजूस "बाग" करिता क्षेत्र आरक्षित करणेत यावी. आरक्षण क्र. २१६ नाव बदलून MP करणेत यावे. आरक्षण क्र.२८ चे नाव बदलून "दुकान केंद्र" व आरक्षण क्र. ४६ चे नाव बदलून "Municipal Purpose" करणेत यावे.

९. इतर सामाजिक सुविधेशी संबंधीत असणारी आरक्षण क्र. १८ BG, १९ MSEB, ७७ Garden, ८६ Town Hall, १३९ MSEB ESS (अंशतः-उत्तरेकडील १८ आर क्षेत्र), १४३ Garden, १६९ Garden, १७८ Garden, १७९ Garbage Collection Centre, १८५ Public Utility,२५० Children's Play Ground, ३८२ MP, ३९० A Garden ,४०२ Library, ४२६ Garden, ४३४ Fire Brigade, ४५७ Municipal Purpose, ४९१ Fire Brigade५०७ Site and Services (स.क्र.३३८ चे क्षेत्र) वगळण्यात यावे.

१०. मौजे सावेडी स.क्र. ८२ पै. आरक्षण क्र. १०७ Social Welfare Department हे दि.२५ जाने. २०२३ चे शासन नोटिस अन्वये वगळण्यात आले. तरी ते प्रस्तावीत जमीन वापर नकाशामधून वगळण्यात यावे.

११. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता आरक्षण क्र. २८७ Municipal Administrative Building यासारख्या एवढ्या मोठ्या जागेवर या हेतुकरीता ठेवणे योग्य नाही. तसेच पालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने सोईस्कर होणेच्या दृष्टीकोणातून मौजे सावेडी येथील स.क्र. २०,२१,२२,२३ यापैकी योग्य तेथे सदर प्रकरणी जागा राखीव ठेवण्यात यावी.

१२. मौजे नालेगाव स. क्र. ३२ पै येथील आरक्षण क्र. ३२५ Municipal Purpose हे यापुर्वीच्या मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाचा भाग असुन सदर आरक्षणाचा मोठा भाग यापुर्वीच कलम ४९ चे नोटीस अन्वये वगळण्यात आलेला असुन राहिलेला भागाचा आकार व क्षेत्र विचारात घेता सदर प्रस्तावीत आरक्षण विकसीत करणेच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. तरी सदर आरक्षण वगळणेत यावे.

१३. आरक्षण क्र. १५३ दफ़नभुमी (अंशतः-स.क्र.२२७ मधील क्षेत्र), आ.क्र. १६० स्मशानभुमी (अंशतः-स.क्र.२२७ मधील क्षेत्र), आ.क्र. ४७४, आ.क्र. ३७४ (अंशतः -स.क्र.४६ मधील क्षेत्र), वगळण्यात यावे.

१४. आरक्षण क्र.४३ Municipal Purposeचे स्थान बदलुन सावेडी स.क्र.२८२ मधील महापालिकेच्या जागेवर टाकन्यात यावे जेणेकरून जागा अधिग्रहनाचा खर्च कमी होईल. आरक्षण क्र.३९ Fire Brigade & Training Centre मधे एका कोपऱ्यात शौचालयाकरिता स्वतंत्र व्यवस्था करनेत यावी.

...९

१५. भिंगारदिवे वस्ती, उदयनगर येथील आ. क्र. १२६ खेळाचे मैदान, आ.क्र. १२७ Social Welfare Dept. येथे अस्तित्वातील घरे असल्याने सदर जागेवरील आरक्षण वगळून उर्वरीत जागेवर अनुक्रमे "खेळाचे मैदान" व "MP" आरक्षण कायम ठेवण्यात यावे.

१६. आरक्षण क्र. १२५ "बगीचा" मधील विद्यमान जमीन वापर नकाशात दर्शविलेल्या शाळेची जागा वगळण्यात यावे. उर्वरीत क्षेत्रातील पश्चिमेकडील ६५ गुंठे क्षेत्र शैक्षणिक सुविधा म्हणून आरक्षण कायम करणेत यावे व इतर उर्वरीत क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात यावे.

१७. मौजे नालेगाव स. क्र.१ पै येथील आरक्षण क्र. २५८ ही जागा पालिकेच्या इमारतीसाठी व फ़ायर ब्रिगेड करीता आरक्षित करणेत आलेली जागा वगळणेत यावी. त्याऐवजी आरक्षण क्र. २५७ मधील दक्षिणेकडील अर्धे क्षेत्र Fire Brigade करिता आरक्षित करणेत यावे.

१८. मौजे नालेगाव येथील आरक्षण क्र. २९२ AMT Bus Stand वगळण्यात यावे व त्याऐवजी जवळच असलेल्या आरक्षण क्र. २५३ ट्रक टर्मिनस मधील दक्षिणेकडील क्षेत्र AMT Bus Stand करीता राखीव ठेवण्यात यावे.

१९. मौजे सावेडी येथील स.क्र. ९६/१, १९, २०, २१, २२, २३ तसेच नालेगाव स.क्र.५०, ५१, ५२ यांसारख्या मोकळ्या जागेवर "खेळाचे मैदान", "क्रिडा संकुल","वनस्पती उद्यान", "Town Hall" "समाज कल्याण" यांसारखी आरक्षणे प्रस्तावीत करणेत यावी.

२०. मौजे चाहुराणा बु. स.क्र. ५१, ५२, १३३, १३४ येथील मोकळ्या जागेवर बगीचा करीता जागा आरक्षित करणेत यावी.

२१. नालेगाव स.क्र.२०२,२०३; केडगाव स.क्र. ३३२, ३४०, ३६०, ३६१, ३६२, ३६३, ३६४, ३६६, ३६५, ३५२, ३५१, ३५३, ३५४, ३५५, ५१७ रहिवास विभागात समाविष्ट करावे. तसेच नालेगाव स.क्र.१८१पै, १७७, १७६, १७५, १३९, १७५अ, व बोल्हेगाव मधील स.क्र. ३७पै, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८ शेती विभागात समाविष्ट करावे.

२२. बोल्हेगाव येथील रस्ते जाळे बळकट करणेच्या दृष्टीकोणातुन स.क्र.१५,२६,२७,१९३ यांमधुन जाणारा व १८मी रस्त्यांना जोडणारा दक्षिणोत्तर रस्ता प्रस्तावित करावा.

२३. मौजे सावेडी येथील स. क्र. ६९ मधील प्रस्तावीत १८.२८ मी रस्त्याशेजारी सुमारे १०० फ़ूट अंतरावर त्यालाच समांतर असा ९ मी ले-आऊट रस्ता असल्याने सदर १८.२८ मी रूंदीचा रस्ता रद्द करुन अस्तित्वातील रस्त्यास रुंदीकरण करून १८ मी दाखविणेत यावा.

२४. आरक्षण क्र.४२६ व आरक्षण क्र.४२७ ही आरक्षणे वगळण्यात येणार असल्याने त्याकरीता पोहोच रस्ता म्हणून प्रस्तावीत करणेत आलेला १२.२० मी रूंद रस्ता वगळण्यात यावा.

२५. मनमाड अहिल्यानगर रस्ता(३० मी) व निंबळक रस्ता(३० मी) यांना जोडणारा नैऋत्य-ईशाण्य रस्ता ३० मी न ठेवता २४ मी करणेत यावा.

२६. सदरचे बदल दर्शवुन, प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रसिध्द करण्यास या ठरावाव्दारे मंजूरी देत आहे.

२७. तसेच, सदर अधिनियमाचे कलम २६(१) नुसार प्रारूप विकास योजना प्रसिध्द करण्यास मुळ मुदत दि.१२/०९/२०२६ पर्यंत मुदत आहे.

अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रारूप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतदारांना सुनावणी देण्यासाठी अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये गठीत होणाऱ्या नियोजन समितीवर महानगरपालिकेचे स्थायी समितीच्या खालील ३ सभासदांची, सदस्य म्हणुन नेमणुक करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

१. **श्री. बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,** नगरसेवक

२. **श्रीमती संध्या बाळासाहेब पवार** नगरसेविका

३. **श्रीमती गौरी अजिंक्य बोरकर,** नगरसेविका

यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने आयुक्त यांनी पुढील प्रशासनीक कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- मा. श्री. अविनाश हरिभाउ घुले

अनुमोदक :-मा. श्री. निखिल बाबासाहेब वारे

ठराव सर्वानुमते मंजूर

**महापौर**

अहिल्यानगर महानगरपालिका